# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि.१४ मार्च,२०२०

## बातमी:-१

जळगाव दि.१४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाअंतर्गत दि.१७ मार्च रोजी आयोजित परिसर मुलाखत पुढे ढकलण्यात आली आहे.

मंगळवार, दि. १७ मार्च रोजी स्वामी विवेकानंद राष्ट्रीय ज्ञानपीठ,जळगाव जामोद संस्थेद्वारा परिसर मुलाखत आयोजित करण्यात आली होती. कोरोना आजाराबाबत संक्रमण किंवा विषाणूंपासून बचाव करण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून परिसर मुलाखत पुढे ढकलण्यात आली आहे. मुलाखतीची पुढील तारीख विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती कक्षाचे समन्वयक प्रा.भुषण चौधरी यांनी दिली आहे.

-----------------------------------------------------------------------------------------------------------

## बातमी:-२

जळगाव १४ () संशोधनात महिला पुरुषांच्या बरोबरीने कार्य करीत असून महाराष्ट्रात ही संख्या अधिक प्रमाणात वाढत चालली आहे. विद्यापीठात संशोधनासाठी वाव असून जास्तीत जास्त महिलांनी याकडे सकारत्मकतेने बघून देश प्रगतीकडे घेऊन जाण्यासाठी मदत करावी असे प्रतिपादन विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. पी.पी.माहुलीकर यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्कुल ऑफ केमिकल सायन्सेसच्यावतीने गुरुवारी राष्ट्रीय विज्ञान दिन व महिला दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय विज्ञान दिन महोत्सव २०२० चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी. माहुलीकर बोलत होते. मंचावर अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाचे समन्वयक प्रा.एस.टी.इंगळे, प्रशाळेचे संचालक प्रा.डी.एच.मोरे, व्य.प.सदस्य प्रा.आर.एस.बेंद्रे, प्रा.गौरी राणे, प्रा.योगिता पाटील व महोत्सवाचे समन्वयक डॉ.दीपक दलाल उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा.माहुलीकर म्हणाले की, नव्याने अनेक आजार निर्माण होत आहेत या सर्वांना नियंत्रणात आणण्यासाठी चंागल्यात चांगले संशोधन कार्य होणे आवश्यक आहे. तसेच आपले कर्तव्य सांभाळतांना संशोधनाकडे वळा असे आवाहन यावेळी त्यांनी केले तसेच डॉ.अब्दुल कलाम यांचे स्वप्न व्हिजन २०२० पूर्णत्वाकडे नेण्यास प्रयत्नशील रहावे असेही यावेळी त्यांनी सांगितले.

प्रा.गौरी राणे यांनी महिलांनी वेळेचे नियोजन कसे करावे याच सादरीकरण केले. प्रा.योगिता पाटील (झेड.बी.पाटील महाविद्यालय,धुळे) यांनी, शब्दांना व्यक्तिमत्व असते आणि आजकाल तर शब्दांनी सुध्दा शोषण केले जाते तेव्हा शब्दांच्या मागील भावना व्यवस्थित

समजून घ्या असा सल्ला दिला. प्रा.आर.एस.बेंद्रे यांनी मेरीक्युरी या शास्त्रज्ञांविषयी व इतर महिला शास्त्रज्ञांनी केलेल्या कार्यावर आपले मनोगत व्यक्त केले.

महोत्सवाच्या पहिल्यासत्रात आयसीटी मुंबईच्या प्रा. जयश्री नगरकर यांनी आनंदीबाई जोशी, टेसी थॉमस, शुभा टोळे यांच्यासह विविध महिला शास्त्रज्ञ यांच्या कर्तृत्वावर मार्गदर्शन केले.

दुस·या सत्रात आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात १०८ स्पर्धक सहभागी झाले होते तर भारतातील प्रमुख शास्त्रज्ञ यांच्यावर सादरीकरण स्पर्धेत ४० विद्यार्थी सहभागी झाले होेते. यास्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे - केमिस्ट्री प्रश्नमंजुषा प्रथम - कामिनी पाटील, करण मोरे, प्रगती पाटील, व्दितीय - कौस्तुभ कुलकर्णी, योगेश बडगुजर, राहुल पाटील, तृतीय - अजय लोहार, पुजा चावडा, मयुरसिंग गिरासे, सादरीकरण स्पर्धा प्रथम - पुजा पाटील, व्दितीय - शिवानी पालीवाल, तृतीय - योगेश बडगुजर

हया महोत्सव आयोजनामागची भूमिका समन्वयक डॉ.दीपक दलाल यांनी मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आशा जंगले आणि स्वाती गोसावी यांनी केले. परिचय डॉ.रुपाली पाटील, डॉ.सोनाली माहुले यांनी तर आभार प्रा.अमरदिप पाटील यांनी मानले.

---

प्रति,<br>
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकात उपरोक्त बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)<br>
जनसंपर्क अधिकारी